MHAU060022992022

**नियमित दिवाणी दावा क्र. ३८६/२०२२ मधील नि.क्र.२७ खालील आदेश**

वादी यांनी सदर अर्ज प्रतिवादी क्रं.५ शेख चांद शेख अहमद यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरील प्रकरणात प्रतिवादी क्रं.५ शेख चांद शेख अहमद हे मयत झालेले आहेत. वादी हे बाहेरगावी वास्तव्यास असल्याने त्यांना सदरील इसमाबाबत जास्त माहिती नाही चौकशी केली असता त्याच्या मुलाबाबत म्हणजेच शेख खैराती शेख चांद हाच एकमेव सदरील शेतजमीन कसत आहे म्हणुन करिता सदरील इसमास मा. न्यायालयाने नोटीस काढली व त्याप्रमाणे सदरील शेख खैराती शेख चांद न्यायालयात हजर झालेला आहे. मयत प्रतिवादीच्या विरुध्द दावा चालविण्याचा अधिकार तयांच्या मृत्यु पश्च्यात त्यांच्या वारसदार विरुध्द चालु राहणार आहे. मयत व्यक्तीचे मिळालेल्या माहितीनुसार त्यांचे वारस खालीलप्रमाणे आहेत.

५.१. शेख रोशन बी. शेख चांद, वय सज्ञान वर्ष, धंदा–घरकाम, रा. बनशेंद्रा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद,

५.२. शेख खैराती शेख चांद, वय सज्ञान वर्ष, धंदा–शेती, रा. बनशेंद्रा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद,

५.३. शेख सिध्दान शेख चांद(सलमा रफीक शेख), वय सज्ञान वर्ष, धंदा–शेती, रा. बनशेंद्रा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, येणेप्रमाणे वारसदार असल्याबाबत माहिती वादी यांना मागील तारखेस झालेली आहे त्याप्रमाणे वारसदारांची नावे दाव्यात समाविष्ट करणे कायदयाच्या व न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. वादीच्या माहितीप्रमाणे इतर वारस नाही. प्रतिवादी क्रं. ५.१ ही प्रतिवादी क्रं. ५ ची पत्नी, प्रतिवादी क्रं. ५.२ हा प्रतिवादी क्रं. ५ चा मुलगा, प्रतिवादी क्रं. ५.३ ही प्रतिवादी क्रं. ५ ची मुलगी आहे. वादी यांना प्रतिवादी क्रं. ५ हे कधी मयत झालेले आहे याबाबत तोंडी माहिती शिवाय काहीही माहिती नाही. प्रतिवादी क्रं. ५ च्या मयताचा दाखला मिळत नसल्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्रं. ५ च्या वारसांना नोटीस काढुन हजर राहण्याबाबत निर्देश दिले होते. त्याप्रमाणे प्रतिवादी क्रं. ५ चे वारस हे हजर झालेले असुन वादी यांना मागील तारखेस योग्य व पुर्ण माहिती मिळाल्यापासुन मयत प्रतिवादी क्रं. ५ चे वारस रेकॉर्डवर घेण्याच्या मुदतीमध्ये प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. सदरील अर्ज करण्यास यदाकदाचित विलंब झालेला असल्यास सदरील विलंब हा नजरचुकीने व अनावधानाने झालेला असुन वादी हे मुळात बाहेरगावी असल्याने त्यांना सदरील प्रतिवादी क्रं. ५ मयत झालेले आहे की नाही याबाबत व त्यांच्या वारसांबाबत पुर्ण माहिती नव्हती. त्याचप्रमाणे वादी यांची आई सतत आजारी राहत असल्यामुळे गावात जावुन माहिती घेणे शक्य झालेले नाही म्हणुन अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला आहे. करिता सदरील विलंब माफ करुन प्रस्तुत प्रतिवादी क्रं. ५ चे वर नमुद वारस दाव्यात समाविष्ट करण्यात येवुन त्यांचे नाव दाखल करण्यास व नमुद करण्यास

3/2/24

परवानगी देण्यात यावी. दाव्यातील प्रतिवादी क्रं. ५ यांच्या नावाच्या बाजुस मयत असे नमुद करुन त्यांच्या नावाखाली वरील प्रमाो वारसांची नांवे नमुद करण्यास व वारसांची नावे रेकॉर्डवर घेण्यात घेवुन त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन हरकत घेतली की, प्रस्तुत प्रकरणात वारसांबाबत कुठलेही कागदपत्र पुरावे वादीने सादर केलेले नाहीत म्हणुन नामंजुर करावा करावा अशी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा अतिक्रमण शेतजमीनीचा ताबा मिळण्याबाबत व कायम स्वरुपी मनाईहुकूम मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. वादीच्या अर्जातील कथनानुसार वादी क्रं. ५ हे मयत झालेले आहे. त्यांचे वारस ५.१.शेख रोशन बी. शेख चांद, ५.२. शेख खैराती शेख चांद, ५.३.शेख सिध्दान शेख चांद(सलमा रफीक शेख), हे आहेत. सदर वादी क्रं.५ मयत झाल्यानंतर वादीने प्रस्तुत अर्ज दिनांक १०.०१.२०२४ रोजी दिलेला आहे. सदर प्रतिवादी मयत असल्याबाबत वादीने नि.क्रं. १० खाली दिनांक २८.०२.२०२३ रोजी पुरशीस दिलेली आहे. त्यानंतर सदर मयत प्रतिवादीच्या वारसांना नोटीस काढण्यात आली होती परंतु त्यानंतर देखील सदर वादीने सुमारे ११ महिण्यांनी प्रस्तत अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्रं. ५ हा कधी मयत झाला याबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नाही परंतु सदर प्रतिवादी मयत असल्याबाबतची बाब प्रतिवादींनी नाकारलेली नाही. प्रस्तुत दावा हा स्थावर मिळकतीबाबत असल्याने तसेच प्रतिवादी क्रं.५ च्या वारसांना सदर दावा चालविण्याचा अधिकार असल्याने त्यांना दाव्यात सामील करणे आवश्यक व गरजेचे आहे. तरी सदर कारणाचा व नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादी क्रं. ५ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे व त्यामुळे दाव्याच्या गुणदोषावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादी यांचा नि.क्र.२७ चा अर्ज प्रतिवादीस रक्कम रुपये ५००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने विहीत मुदतीत दुरुस्ती करावी.

3/2/24

**(पी.एम.कोळसे)**

दिनांक- ०३.०२.२०२४

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (न्यायालय क्रं.१)
कन्नड